झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी
चिंचवड क्षेत्र, मुथ्था चेंबर्स, सेनापती बापट रोड, पुणे- १६.
जा.क्र.झोपुप्रा/सप्रा-१/झोपुआ/ ८८ /२०२४
दिनांक :-१८/०१ /२०२४

# झोपडपट्टी पुनर्वसन आदेश

## ( झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करण्याची पूर्वसूचना )

प्रस्तावना-

महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ (प्रस्तुत आदेशात या अधिनियमाचा उल्लेख यापुढे उक्त अधिनियम असा करणेत येत आहे) चे कलम ३अ नुसार महाराष्ट्र शासन, गृहनिर्माण विभाग, अधिसूचना क्र.झो.पु.यो.-२००४/प्र.क्र.-२१३/झोपसु-१, दि.३०/०६/२००५ अन्वये पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्राकरिता झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली आहे.

या प्राधिकरणाकडून उक्त अधिनियमाच्या कलम ३ब मधील तरतुदींनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकांच्या क्षेत्रासाठी सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना तयार करणेत आलेली असून शासनाच्या मान्यतेने सदरची सर्वसाधारण झोपडपट्टी पुनर्वसन योजना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात दि.११/०९/२०१४ रोजी अंतिमत: प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

(१) ज्याअर्थी, पुणे महानगरपालिका हद्दीतील खालील अनुसूचीमध्ये नमुद गाव पर्वती स.नं.५४/२, सि.स.नं.३६११ पै., येथील झोपडपट्टी क्षेत्रावर (अंशत:) अंदाजे क्षेत्रफळ ७६००.०० चौ.मी. (प्रस्तुत जाहीर प्रकटनात या मिळकतीचा उल्लेख यापुढे सदर मिळकत असा करणेत येत आहे) झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेसाठी सदर क्षेत्रातील झोपडीधारकांनी ७०% संमती देऊन नियुक्त केलेले विकसक मे.असेंन्ट व्हर्टिकॉन डेव्हलपर्स यांचेमार्फत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दि.२७/०७/२०१५ रोजी झोपडपट्टी पुनर्वसनाचा प्रस्ताव दाखल करणेत आलेला आहे आणि सदर क्षेत्रातील झोपडपट्टीचे सर्व्हेक्षण करुन उक्त अधिनियमातील कलम ३(क) च्या तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणेकामी सदरचे क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र घोषित करणे आवश्यक असल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे यांची खात्री पटली आहे; आणि

(२) ज्याअर्थी, सदरचे क्षेत्र हे पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्टयांच्या या प्राधिकरणाकडील यादीमध्ये पुर्णत: समाविष्ट करणेत आले आहे; आणि

(३) ज्याअर्थी, उक्त क्षेत्र तत्कालीन सक्षम प्राधिकारी पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे यांनी सदरचे क्षेत्र महाराष्ट्र शासन राजपत्र दि.१८/०९/१९८०, पान न.२८९३ वर प्रसिद्ध अधिसूचनेद्वारे उक्त अधिनियमाच्या कलम ४(१) मधील तरतुदीनुसार झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित केले आहे; आणि

(४) त्याअर्थी, मी नीलेश गटणे, मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा., पुणे उक्त अधिनियमाच्या कलम ३क मधील नमूद तरतूदीन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालील अनुसूचिमध्ये निर्दिष्ट करण्यात आलेले हे क्षेत्र या आदेशाद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

आदेश :-

१. या प्राथमिक आदेशाद्वारे मालकी हक्क प्राप्त असलेले खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांना असे सूचित करण्यात येते की, त्यानी उक्त क्षेत्र पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषित करणेबाबत त्यांची कोणतीही सूचना /आक्षेप/ हरकत असल्यास, ती सदरचा आदेश प्रसिद्ध करण्यात आल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे - १६ यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत लेखी स्वरुपात आवश्यक ती कागदपत्रे आणि पुराव्यांसह सादर करावी. विहीत मुदतीनंतर प्राप्त होणारे आणि सबळ पुराव्याशिवाय दाखल केलेले कोणतेही आक्षेप / हरकती / सूचना / दावे या कार्यालयाकडे स्विकारले जाणार नाहीत अथवा विचारात घेतले जाणार नाहीत याची जाणीव याद्वारे करून देण्यात येत आहे.

२. सदरच्या आदेशामुळे व्यथित होणाऱ्या व्यक्तींस, उक्त विहीत मुदतीत मालकी हक्क प्राप्त असलेल्या खाजगी व्यक्ती / शासकिय विभाग / सार्वजनिक प्राधिकरणे / स्थानिक संस्था यांचेकडून प्राप्त आक्षेप / हरकती / सूचना / दावे यावर त्यांना म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात येईल. त्यांचे म्हणणे व दाखल केलेले कागदपत्र आणि पुरावे विचारात घेऊन उक्त अधिनियमाच्या कलम ३क (१) अन्वये सदरचा आदेश कायम करण्याबाबत व अधिसूचनेमध्ये समाविष्ट क्षेत्र झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून अंतिमत: घोषित करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. असा निर्णय मा.उच्च स्तरीय तक्रार निवारण समिती, वांद्रे, मुंबई यांच्याकडे दाखल त्यावरील कोणत्याही अपिलातील निर्णयास अधिन राहुन अंतिम असेल.

## अनुसूची

**झोपडपट्टीचे नाव** :- स.नं.५४/२, सि.स.नं.३६११ पै., पर्वती, पुणे

**महानगर पालिका क्षेत्र** :- पुणे

| गाव | स.नं. | जमीनीचे मालकी हक्क प्राप्त असलेल्या संस्थेचे नाव | क्षेत्र ( चौ. मी.) | चतु:सिमा | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| पर्वती | स.नं.५४/२, सि.स.नं.३६११ पै. | खाजगी | ७३८१.५४ चौ.मी. | **पुर्वेस** - लागु रस्ता<br>**पश्चिमेस** - लागु रस्ता<br>**दक्षिणेस** - लागु रस्ता<br>**उत्तरेस** - सि.स.नं.३६११ पै. उर्वरीत मिळकत | |

सदरचा आदेश हा माझे सहीने व कार्यालयाच्या शिक्क्यासह देणेत आला आहे.

**स्थळ** :- झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

दिनांक :- / /२०२४

19.1.24

(नीलेश गटणे, भा.प्र.से)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

1811

प्रत :-

१. मा. जिल्हाधिकारी, पुणे
२. मा. आयुक्त, पुणे महानगरपालिका यांना माहितीस्तव.
३. व्यवस्थापक, मुद्राणालय, येरवडा कारागृह, पुणे-०६
   वरिल अधिसूचना महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिद्ध करून त्याच्या ५ प्रति या कार्यालयास देयकासह पुरविण्यात याव्यात हि विनंती.
४. विकसक मे. असेंन्ट व्हर्टीकॉन डेव्हलपर्स, ८१३, प्रदिप चेंबर्स, भांडारकर रोड, पुणे - ४११००४